**वि.दि.दा.क्र.९/२०१६**
**नि.क्र.१४३.**
**प्रतिवादी क्र.३ तर्फे साक्षीदार क्र.२**

**प्रतिवादी क्र.३ तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा सरतपास शपथेवर**

**नांव :** संतोष बाळासाहेब लाडेकर

**वय : ४८** वर्षे, **धंदा:** स्टॅम्प विक्री,

**रा.** भूम, ता. भूम जि. धाराशिव.

**सरतपास विधिज्ञ श्री. पी. टी. गाढवे यांच्यामार्फत सुरु-**

१. मी सन २००५ पासुन तहसील कार्यालयाच्या लगत असलेल्या माझ्या दुकानात स्टॅम्प विक्रीचा व्यवसाय करतो. माझ्याकडे स्टॅम्प विक्रीचा परवाना आहे. मी फक्त गैरन्यायीक स्टॅम्पची विक्री करतो. आता मला या प्रकरणात दाखल असलेला निशाणी क्र. १३४ वरील स्टॅम्प दाखविण्यात आला. तो मीच विक्री केला होता. तो स्टॅम्प आदीनाथ तुकाराम देवकर यांनी माझ्याकडून खरेदी केला होता. मी आज माझ्यासोबत स्टॅम्प विक्री रजि. आणले आहे. त्यातील नोंदीनुसार तो स्टॅम्प मी दिनांक १८.१२.२०१५ रोजी विक्री केला होता. स्टॅम्पवर असलेली तारीख व रजिष्टरमध्ये असलेली नोंद तारीख सारखी आहे.

**उलटतपास वादीतर्फे व्ही.डी. पवार वकील यांच्या मार्फत -**

२. स्टॅम्प विक्रेत्याने किती स्टॅम्प खरेदी केले व किती स्टॅम्प विक्री केले याची पडताळणी दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत होते. स्टॅम्प खरेदी कोषागार कार्यालय, भूम येथुन होते. आम्ही तेथुन खरेदी केलेल्या स्टॅम्पवर कोषागार कार्यालयाचा शिक्का व तारीख असते. तदनंतर आम्ही तो स्टॅम्प विक्री करतेवेळेस आमचा त्यावर शिक्का व विक्रीची तारीख नमूद करतो. आमच्याकडून स्टॅम्प खरेदी करणा-या इसमाच्या नांवाची नोंद व खरेदीची तारीख आम्ही आमच्याकडील

रजिष्टरला ठेवतो. आम्ही विक्री केलेल्या स्टॅम्पची पावती आम्हाला संबंधीत स्टॅम्प खरेदीदाराला देणे बंधनकारक आहे. त्या पावतीलाही क्रमांक नमूद असतो. त्या पावतीचे स्वतंत्र नोंदणी बुक/रजिष्टर असते. निशाणी क्र. १३४ वरील स्टॅम्प विक्री बाबत मी संबंधीत इसमाला पावती दिली नाही. मी त्या स्टॅम्प विक्रीच्या पावतीचे रजिष्टर सोबत आणले नाही. मी विक्री केलेल्या त्या स्टॅम्पच्या पावतीची पावती रजिष्टरला नोंद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. १३४ वरील स्टॅम्प वर स्टॅम्प खरेदी करणा-याची सही नाही. माझ्या दुकानात सुमारे पाच ते सात मुले कामाला आहेत. मी दुकानात हजर नसताना माझ्या पश्चात्य ती मुले स्टॅम्प विक्री करतात. ती मुले कधी-कधी स्टॅम्पवर स्टॅम्प खरेदी करणा-याच्या सहया न घेता ते स्टॅम्प विक्री करतात. स्टॅम्पवरील तारखेमध्ये चुक झाल्यास मी त्या ठिकाणी प्रतिस्वाक्षरी करतो.

**उर्वरीत उलटतपास मध्यान्हमुळे तहकुब**

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.07.27 17:34:23 +0530

ठिकाण - भूम. (राहुल द. डांगे)
दिनांक – २७/०७/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,भूम.

**उर्वरीत उलटतपास मध्यान्हांनंतर वादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. डी. पवार यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी आज माझ्यासोबत आणलेले स्टॅम्प रजिष्टर हे प्रमाणीत रजिष्टर नाही. त्यावर दुय्यम निबंधक कार्यालयाचा कोणताही शिक्का अथवा रजिष्टर प्रमाणीत असल्याबाबत प्रमाणपत्र नाही. मी सदरहु रजिष्टरमधील संबंधीत नोंदीचा पान क्र. ७९, ८० व ८१ ची प्रत दाखल करु शकतो. निशाणी क्र. १३४ वरील स्टॅम्प विक्री नंतर तीन जणांना स्टॅम्प विक्री केल्याची नोंद स्टॅम्प रजिष्टरला केलेली आहे. मी आज सोबत आणलेल्या रजिष्टरमध्ये पान क्र. ८१ मध्ये नमूद अनुक्रमांक १ मधील काही नोंदींच्या नंतर

सुमारे पाच ठिकाणी जागा रिक्त ठेवलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. १३४ वरील स्टॅम्प विक्रीच्या रजिष्टरमधील नोंदी नंतर एक जागा रिकामी ठेवलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या रिकाम्या जागा आम्ही मागील तारखेमध्ये लोकांना स्टॅम्प देण्यासाठी ठेवतो. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. १३४ वरील स्टॅम्प हा मागील तारखेमध्ये देण्यात आला आहे.

४. स्टॅम्प विक्री नंतर त्यावर नमूद करण्यात येणा-या मजकुराशी आमचा संबंध नसतो. त्यामुळे त्या स्टॅम्पचा कोणत्या कारणासाठी वापर करण्यात येतो व त्यावर लिहुन घेणार व देणार कोण आहेत याच्याशी आमचा संबंध नसतो. हे म्हणणे खरे नाही की, मला साक्षीला येण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ ने सांगितले. मी प्रतिवादी क्र. ३ ला चेहरापट्टीने ओळखतो. तो सुमारे पाच ते सहा वर्षापासुन माझ्याकडे येतो. साक्षीला येण्यापुर्वी काही दिवसांपुर्वी समाधान कसाब मला भेटला होता व त्याने माझ्याकडुन खरेदी केलेल्या स्टॅम्पबाबत साक्ष द्यावी लागेल असा म्हणाला होता. माझे समाधानशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्याला मदत करण्यासाठी मी त्याच्या सांगण्यावरुन आज खोटी साक्ष देत आहे.

उलत तपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

RAHUL DATTATRAY DANGE

Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.07.27 17:34:34 +0530

ठिकाण - भूम.
दिनांक – २७/०७/२०२६.

(राहुल द. डांगे)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,भूम.

वि.दि.मु.क्र.९/२०१६
नि.क्र. १४३

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file evidence are same, word to word, as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Sayyad R.M.,<br>Stenographer G-II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division,<br>Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 27/07/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 27/07/2026 |
| Order uploaded on | --- | 27/07/2026 |